## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १३५व्या बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| **दिनांक** | **:** | **३० ऑगस्ट, २०१४ (शनिवार)** |
| **वेळ** | **:** | **सकाळी १०.०० वाजता** |
| **सभास्थान** | **:** | **सहयाद्री राज्य अतिथीगृह,<br>बी.जी.खेर मार्ग,<br>मलबार हिल,<br>मुंबई - ४०० ००६.** |

**उपस्थित सदस्य :**

| | |
|---|---|
| श्री.पृथ्वीराज चव्हाण<br>माननीय मुख्यमंत्री | अध्यक्ष |
| श्री. नवाब मलिक<br>विधानसभा सदस्य | सदस्य |
| श्री. प्रशांत ठाकूर<br>विधानसभा सदस्य | सदस्य |
| श्री. यशोधर फणसे<br>अध्यक्ष, स्थायी समिती व<br>नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री. दिलीप पटेल<br>नगरसेवक,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री. मनु कुमार श्रीवास्तव<br>प्रधान सचिव (१),<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |
| श्री. देबाशिष चक्रबर्ती<br>प्रधान सचिव,<br>गृहनिर्माण विभाग,<br>महाराष्ट्र शासन | सदस्य |
| श्री. सीताराम कुंटे<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | सदस्य |
| श्री. संजय भाटिया<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको | सदस्य |
| श्री. यु.पी.एस. मदान<br>महानगर आयुक्त | सदस्य-सचिव |

**<u>निमंत्रित :</u>**

श्री. नारायण मानकर
महापौर,
वसई-विरार शहर महानगरपालिका

श्रीमती कविता गायकवाड
अध्यक्षा,
रायगड जिल्हा परिषद

श्री. सुनील चौधरी
नगराध्यक्ष,
अंबरनाथ नगरपरिषद

श्रीमती चारुशीला घरत
नगराध्यक्षा,
पनवेल नगरपरिषद

श्री. श्रीकांत सिंह
प्रधान सचिव (२),
नगर विकास विभाग व
प्रधान सचिव (विशेष प्रकल्प) (अतिरिक्त कार्यभार),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन

बैठकीच्या सुरुवातीस, मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी सर्व उपस्थित सदस्यांचे स्वागत केले.

त्यानंतर, महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाचे सदस्य श्री. स्वाधीन क्षत्रिय, मुख्य सचिव यांचे 'पदसिध्द सदस्य' म्हणून स्वागत व अभिनंदन केले.

तसेच शासनाचे माजी मुख्य सचिव, श्री.ज.स.सहारिया यांनी प्राधिकरणाचे 'पदसिध्द सदस्य' म्हणून बजावलेल्या बहुमोल सेवेचाही येथे गौरवपूर्ण उल्लेख केला.

त्यानंतर, विषयपत्रिकेतील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

**<u>बाब क्र.१ :</u>** **<u>दिनांक २७ जून, २०१४ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (१३४व्या) बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.</u>**

चर्चेनंतर, कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ :** **दिनांक २७ जून, २०१४ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या मागील (१३४व्या) बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल**

कार्यवाही अहवालावर चर्चा करताना बाब क्र.२५ या विषयावर चर्चा करताना प्राधिकरणाचे सदस्य श्री. दिलीप पटेल, नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी सदर प्रस्ताव लांबणीवर का टाकण्यात आला अशी विचारणा केली. त्यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सदर प्रकल्प महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडे आहे व त्यांनी तयार केलेला Financial Model, ज्यात संपूर्ण रक्कम कर्ज स्वरुपात दाखविलेली आहे, तो व्यवहार्य नाही. शिवाय त्यांनी दाखविलेली प्रकल्पाची किंमत फार जास्त आहे. या कारणामुळे सदर प्रस्ताव लांबणीवर टाकण्यात आलेला आहे.

त्यावर प्राधिकरणाचे सदस्य श्री.नवाब मलिक, विधानसभा सदस्य व मा. मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी असे सूचित केले की, सदर विषयाबाबत शासन पातळीवर वेगळी बैठक घेण्यात यावी.

त्यानंतर, कार्यवाही अहवालाची नोंद प्राधिकरणाने घेतली.

**बाब क्र.३ :** **प्राधिकरणाने वांद्रे कुर्ला संकुलामधील वितरीत केलेल्या भूखंडासाठी विलंबाने अदा केलेल्या रक्कमेवर विधानमंडळाच्या लोकलेखा समितीने केलेल्या शिफारशीनुसार चक्रवाढ पध्दतीने व्याज आकारणेबाबत.**

३.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, लोकलेखा समितीने केलेल्या वांद्रे कुर्ला संकुलातील भू-भाडयाच्या थकीत / विलंबीत रक्कमेवर चक्रवाढ व्याज पध्दतीने व्याजाची परिगणना करण्याबाबत शिफारस करण्यात आल्याचे निदर्शनास आणले. परंतू, सद्य:स्थितीत प्राधिकरण अशा प्रलंबित रक्कमांवर सरळव्याज पध्दतीने द.सा.द.शे. १४% दराने विलंब व्याजांच्या रक्कमेची वसूली करण्यात येत असल्याचे नमूद केले. त्याचप्रमाणे शासनाच्या इतर अंगिकृत उपक्रमामध्ये उदा. म्हाडा, सिडको या आस्थापनांमध्ये सुध्दा विलंबित व्याजाची परिगणना सरळव्याज पध्दतीने करण्यात येत असल्याचे महानगर आयुक्तांनी विषद केले. तसेच १४% सरळ व्याज न आकारता जर १०.२५% (Base Rate) प्रमाणे चक्रवाढ पध्दतीने व्याज आकारले तर ते सध्या आकारण्यात असलेल्या व्याजापेक्षा कमीच असणार, हे ही सभेस उदाहरणासह दाखवून समजून सांगितले. सदर बाब विचारात घेता, प्राधिकरणाने निर्देश दिलेत की, प्राधिकरण सध्या अवलंबित असलेल्या पध्दतीनेच विलंब व्याजाची

परिगणना करण्याबाबत प्राधिकरणाने सूचित करुन खालीलप्रमाणे ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. १३२५ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४च्या कलम ३ चे पोटकलम (२) नुसार उक्त अधिनियमांच्या कलम ५० अनुसार मिळालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण याद्वारे प्राधिकरणात सध्या विलंबित रकमेवर आकारण्यात येत असलेल्या सरळ व्याजाच्या पध्दतीनुसारच व्याज आकारणी करण्यास मान्यता देत आहे."

**बाब क्र.४ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सन २०१३-२०१४ चा वार्षिक अहवाल.**

४.१ महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाचा सन २०१३-१४ चा वार्षिक अहवाल सादर करताना असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे विविध योजना व प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येते. त्याबाबतची एका वर्षाची माहिती या वार्षिक अहवालात समाविष्ट करण्यात आलेली आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सन २०१३-१४ चा वार्षिक अहवाल प्राधिकरणाच्या बैठकीपुढे मंजूरीसाठी सादर करण्यात आलेला आहे.

४.२ महानगर आयुक्त यांनी पुढे असेही सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम २४ अन्वये प्राधिकरणाने ( दिनांक ३१ मार्च रोजी समाप्त होणारे) प्रत्येक वर्ष संपल्यानंतर, मागील वर्षाच्या कार्याचा अहवाल तयार करुन तो राज्य शासनास दिनांक ३० नोव्हेंबर पूर्वी सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार सन २०१३-१४ चा वार्षिक अहवाल प्राधिकरणाच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.

४.३ या विषयावर चर्चा करताना प्राधिकरणाचे सदस्य श्री. दिलीप पटेल, नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी असे सांगितले की, ओशिवरा जिल्हा केंद्र येथील रस्त्याचे काम बंद आहे. तसेच भू-विकासकांना पायाभूत सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. तसेच जोडरस्तेसुध्दा नाहीत. त्याकडे प्राधिकरणाने लक्ष देणे आवश्यक आहे. तसेच गोरेगांव-जोगेश्वरी रस्त्यावर सांडपाणी वाहून नेण्यासाठी गटार लाईनचे काम केलेले नाही. यावर महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाच्या मागील बैठकीत महत्वाच्या रस्त्यांची कामे मंजूर करण्यात आली असून, त्या कामांच्या निविदा प्रक्रिया

चालू असून, सदरहू कामे लवकरच सुरु करण्यात येणार आहेत. उपरोक्त कामामध्ये गटार लाईनच्या कामाचा समावेश करण्यात आलेला आहे.

४.४ त्यानंतर, प्राधिकरणाने सन २०१३-१४ च्या वार्षिक अहवालास मान्यता दिली आणि पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. १३२६:**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सन २०१३-१४ च्या वार्षिक अहवालास प्राधिकरण याव्दारे मान्यता देत आहे व हा अहवाल राज्य शासनास सादर करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.५ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील अधिकारी व कर्मचारी यांना सन २०१३-२०१४ या वित्तीय वर्षासाठी सानुग्रह अनुदानास मंजूरी मिळणेबाबत.**

५.१ या प्रस्तावाबाबत माहिती देताना महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, मुं.म.प्र.वि.प्राधिकरणाच्या दिनांक २७ जून, २०१४ रोजी झालेल्या १३४व्या बैठकीमध्ये प्राधिकरणातील अधिकारी / कर्मचारी यांना सन २०१२-१३ या वित्तीय वर्षासाठी सानुग्रह अनुदानास कार्योत्तर मंजूरी देताना महागाईचा दर १० टक्क्यांनी वाढलेला असल्यामुळे त्याच प्रमाणात सानुग्रह अनुदानात वाढ होणे योग्य असल्याचे नमूद केले. सन २०१२-१३ या वर्षासाठी मंजूर केलेल्या रु.१८,०००/- सानुग्रह अनुदानाची रक्कम मंजूर करण्यात आली होती, त्यामध्ये १०% वाढ करुन सन २०१३-१४ या वित्तीय वर्षाकरीता रु.१९,८००/- इतकी रक्कम मंजूर करण्याचे प्रस्तावित केले आहे. प्राधिकरणातील कर्मचारी व मागासवर्गीय संघटनेच्यावतीने सानुग्रह अनुदानाच्या रक्कमेत वाढ करण्यासाठी सध्याची वाढती महागाई लक्षात घेऊन सर्व अधिकारी / कर्मचा-यांना रु. २५,०००/- इतकी रक्कम सानुग्रह अनुदान म्हणून देण्यात यावी अशी विनंती प्राधिकरणाकडे करण्यात आली आहे.

५.२ मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी असे सांगितले की, मागील वर्षी देण्यात आलेल्या सानुग्रह अनुदानामध्ये १०% वाढ करुन सन २०१३-१४ या वर्षाकरीता रु.१९,८००/- इतका सानुग्रह अनुदान मंजूर करावा.

..६/-

५.३ त्यानंतर, बाब टिप्पणीतील प्रस्तावास मान्यता देऊन प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. १३२७ :**

**"असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ४ (अ) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, प्राधिकरण याव्दारे मुं.म.प्र.वि. प्राधिकरणातील कर्मचारी / अधिकारी यांना सन २०१३-२०१४ या वित्तीय वर्षाकरीता रु.१९,८००/- इतके सानुग्रह अनुदान मंजूर करण्यास याव्दारे मंजूरी देण्यात येत आहे.

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**मा.अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय**

(१) प्राधिकरणाच्या निमंत्रित सदस्या श्रीमती कविता गायकवाड, अध्यक्षा, रायगड जिल्हा परिषद यांनी मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांच्याकडे असे निवेदन केले की, वांगणी - कर्जत रस्त्यांची अवस्था खराब असून दिवसेंदिवस रस्ते अजूनही खराब होत चाललेले आहेत. त्यामुळे अधिकाऱ्यांकडे वारंवार तक्रारी करुनही अधिकारी लक्ष देत नाहीत. त्यावर मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी अशा सूचना दिल्या की, सदर विषयासंबंधी संबंधित अधिका-यांसह सदर परिसरातील रस्त्याची पहाणी करुन योग्य ती कार्यवाही करावी.

(२) प्राधिकरणाचे निमंत्रित सदस्य श्री. सुनिल चौधरी, नगराध्यक्ष, अंबरनाथ नगरपरिषद यांनी प्राधिकरणास विनंती केली, अंबरनाथ नगरपरिषद क्षेत्रातील (१) हुतात्मा चौक ते एमआयडीसी कडे जाणारा मुख्य रस्ता (२) स्वामी समर्थ चौक लोकनगरीकडे जाणारा रस्ता (३) परांजपे चाळ ते मालेगांवकडे जाणारा रस्ता (४) चिंचपाडा ते म्हरळकडे जाणारा रस्ता या रस्त्यांची कामे तातडीने हाती घेऊन त्या परिसरातील वाहतूकीची समस्या दूर करणे आवश्यक आहे. तरी त्यास कृपया मान्यता द्यावी अशी मा.मुख्यमंत्री यांना विनंती केली व तसे निवेदन त्यांनी मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांना सादर केले.

त्यानंतर, अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

----------xox-----------